

अष्टविनायक कथा

दत्ता. जी. कुलकर्णी



नलिनी प्रकाशन
पुणे २

अष्टविनायक कथा

दत्ता जी. कुलकर्णी

नलिनी प्रकाशन, पुणे ३०

★ नलिनी प्रकाशन : २४ (४)

★ प्रकाशक : द. गं. कुलकर्णी, १७७ सदाशिव, कॉमनवेल्थशेजारी
लक्ष्मीपथ, पुणे ३०

★ मुद्रक : शा. चं. आगाशे, श्री शिवाजी प्रिंटिंग वर्क्स,
४९५-४९६ शनिवार, पुणे ३०

★ द्वितीयावृत्ती : फेब्रुवारी १९७०

अष्टविनायक कथा

आणि

महाराष्ट्रातील अन्य अष्ट गणेश

अशी

सोळा गणेश स्थानांची माहिती

आणि

मार्गदर्शक नकाशा


प्रार्थना-

जय जयाजीं गणेशजीं ।
तूज प्रार्थितो दत्ताजीं ।
चिंतामणी विनायका ।
झाल्या जरीं अनंत चुका ।
ढुंढिराजा क्षमा करीं ॥ १ ॥

मयूरेशा, लंबोदरा ।
खळखळू दे मांगल्य झरा ।
हरीं अवकृपा तिमिरा
बा, गजानना, हेरंबा ।
वक्रतुंडा जग्नायका ॥ २ ॥

हे सिद्धी बुद्धिपतीं,
जना द्यावीं सद्बुद्धि तीं
सद्विद्येचीं वाढवीं महतीं
बा विघ्नेश्वरा विघ्नेहरा
जग्नायका विश्वपालिका ॥ ३ ॥

श्री अष्टविनायक-स्थान-दर्शक



श्रीसमर्थ रामदास स्वामींचे गणेशस्तवन

ॐ नमोजी गणनायका । सर्व सिद्धि फळदायका । अज्ञानभ्रांति छेदका । बोधरूपा ॥ १ ॥ वंदूनिया मंगळनिधी । कार्य करितां सर्व सिद्धि । आघात अडथळे उपाधी । बाधूं शकेना ॥ ऐसा सर्वांगे सुंदरू । सकळ विद्यांचा आगरू । त्यासी माझा नमस्कारू । साष्टांग भावें ॥ ध्यान गणेशाचे वर्णितां । मति प्रकाश होये भ्रांता । गुणानुवाद श्रवण करितां । वोळे सरस्वती ॥ जयासी ब्रह्मादिक वंदिती । तेथे मानव बापूडे किती । असो प्राणी मंदमती । तेहीं गणेश चिंतावा ॥

श्रीगणेश एकविंशतिनामस्तोत्रम्

गणेशं एकदंतं च चिंतामणिं विनायकं । ढुंढिराजं मयूरेशं लंबोदरं गजाननं । हेरंबं वक्रतुंडं च ज्येठराजं निजस्थितं । आशापूरं तु वरदं विकटं धरणीधरं ॥ १ ॥ सिद्धिबुद्धिपतिं वंदे ब्रह्मणस्पतिसंज्ञितं । मांगल्येशं सर्वपूज्यं विघ्नानां नायकं परं । एकविंशति नामानि गणेशस्य महात्मनः ॥ २ ॥ जपकाले पठेद्यस्तु यात्राकाले विशेषतः । विघ्नानि तस्य नश्यन्ति सर्वत्र विजयी भवेत् ॥ ३ ॥

श्री अष्टविनायक अवतार वर्णन

निर्गुण सगुण प्रणवाकृती । एक असे हा गणपती । रक्षावया भक्ताप्रती । अष्टस्थानीं प्रगटला ।। १ ।। मयूरक्षेत्रीं उद्धरिला कमलासुर । सिद्धटेकीं हरीनें तप केलें घोर । बल्लाळाचा केला उद्धार । मुरूड क्षेत्रीं प्रकटोनी ।। २ ।। महड क्षेत्रीं विनायक । प्रगटोनियां भक्तपालक । दुष्ट दानव वधोनी सकळिक । मुनी द्विजांसी रक्षिलें ।। ३ ।। विधीने तप करितां स्थावरभुवनीं । तेथे प्रगटला चिंतामणी । भ्रांती गेली निरसोनी । स्वारसामर्थ्यासी लाधला ।। ४ ।। लेण्याद्रि दिव्य पर्वती । पार्वत्यात्मज झाला श्रीगणपती । दानव मर्दोनि पापमती । रक्षण केलें नगजेचें ।। ५ ।। ओझर क्षेत्रीं विघ्नहर । प्रकट झाला सर्वेश्वर । भक्तांचीं संकटें केली दूर । समूळ विघ्नें वारोनी ।। ६ ।। रांजणगावीं श्रीगणपती । प्रगट झाली श्रीब्रह्ममूर्ती । आश्वासूनि सूरांप्रती । स्थापिलें स्वपदीं सर्वांतें ।। ७ ।।



सिंधू राक्षसाला मारणारा—

मोरगावचा मयूरेश्वर

पुणें जिल्ह्यातील भिमथडी तालुक्यात मोरगाव हें अष्टविनायकातील एक स्थान आहे. मयूरेश्वर त्याचें नाव आहे. मयुरेश्वराविषयीची कथा अशी आहे—

फार फार वर्षांपूर्वीं चक्रपाणी नांवाचा निपुत्रिक राजा गंडकी नगरीत राज्य करीत होता. शौनक ऋर्षींच्या आर्शीवादाने त्याला एक मुलगा झाला. चक्रपाणीनें त्याचें नांव 'सिंधू' असें ठेविलें.

सिंधूनें तपश्चर्या करून सूर्याला प्रसन्न करून घेतलें. सूर्याकडून त्यानें अमरत्वाचा वर मागून घेतला. त्यावेळी सूर्य त्याला म्हणाला तुला मी अमृताचे जेवण देतो. जोपर्यंत अमृत तुझ्या पोटांत असेल, तोपर्यंत तुला मरण येणार नाहीं.

सूर्यापासून असा वर प्राप्त करून 'सिंधू' गंडकी नगरांत पुन्हां आंला. पित्यानें त्याच्या ताब्यांत राज्य दिलें व तो वनांत निघून गेला.

आपण अमृत पोटांत असेपर्यंत अमर आहोत. हे 'सिंधू' च्या लक्षांत होतेच, बापाच्या एवढ्याशा राज्यानें त्याला संतोष होईना. म्हणून तो जग जिंकायला सैन्यासह निघाला. त्याचा पराक्रम पाहून अनेक दैत्य त्याच्याकडे नोकरीस आले.

शूर दैत्यांच्या जोरावर त्यानें जग जिंकलें व देवलोकांकडे त्यानें आपली नजर वळविली.

इंद्रलोकाकडे तो निघाला. इंद्राची राजधानी अमरावती होती. तिच्यावर त्यानें हल्ला केला. सुंदर शहर पाहून राक्षसांनी तें लुटायला सुरुवात केली. देव पळूं लागले. देवांचा राजा इंद्र रागारागानें आपल्या ऐरावत हत्तीवर बसून लढण्यासाठीं निघाला. पण सिंधूनें त्या प्रचंड ऐरावताचे खांबासारखे दांत कचकड्याच्या हत्तीच्या दांतासारखे वाकडे केले. ऐरावत जमिनी वर कोसळला. इंद्र जमिनीवर आपटला. 'सिंधू' राक्षसानें इंद्राचे पाय धरून त्याला भोंवऱ्यासारखें गरागरा फिरविले. पण इंद्र कसला वस्ताद!

देवांचाच राजा तो! त्याला रूप बदलण्याची विद्या माहीत होती. दैत्यानें त्याला जमिनीवर आपटण्यापूर्वी तो मुंगीएवढा झाला. घाबरलेल्या देवांना बरोबर घेऊन तो विष्णू लोकांकडे निघाला.

विष्णु लढाईला उभा राहिला तेव्हा इंद्राला 'सिंधू' राक्षसाचा मघाशी गरागरा फिरवल्याचा राग होताच. तो वज्र घेऊन पुढें झाला. सिंधूनें एक थप्पड मारून त्याला खालीं पाडलें तें बघून कुबेर तर पळालाच. वरुणदेव आणि यमदेव यांचासुद्धां 'सिंधू' नें पराभव केला. विष्णूनें रागानें त्याच्यावर सुदर्शनचक्र सोडलें. पण सिंधूनें तें आपल्या चक्रानें खालीं पाडलें. विष्णूनें नेम धरून रागारागानें त्याच्यावर गदा फेकली. सिंधूने तिचे

तुकडे करून फेकून दिले. विष्णू आश्चर्यानें सिंधूकडे पहातच राहिला. त्याने म्हटलें, " तुझ्या पराक्रमावर मी प्रसन्न आहे. तुला हवा तो वर माग."

सिंधू म्हणाला, "तर मग तूं युद्ध बंद करून माझ्या गंडकी नगरात येऊन रहा."

विष्णू सिंधूच्या नगरींत येऊन राहिला. सिंधूनें जगांत जाहीर केलें कीं, कोणीहि आजपासून देवांची पूजा करू नये. माझीच पूजा करावी. सिंधूच्या कैदेत असलेल्या देवांना ही बातमी ऐकून वाईट वाटलें. त्यांनी गुप्तपणें विनायकाची मातीची मूर्ति तयार करून तिची प्रार्थना केली. तेव्हां विनायकानें प्रकट होऊन सांगितलें कीं, "मी लवकरच मयुरेश्वर म्हणून जन्मास येणार आहे. त्यावेळीं सिंधू राक्षसाचा समाचार मी घेणार आहे." असें म्हणून विनायक गुप्त झाला. सिंधूनें देवांचा छळ मांडल्यामुळे शंकरालासुद्धा कैलास सोडावा लागला. मुनीलोक आपले आश्रम सोडून जंगलांत राहूं लागले. आपला कैलास पर्वत सोडल्याचें दुःख पार्वतीला झालें होतें. तिनें शंकरांच्या सांगण्यावरून बारा वर्षें तपश्चर्या केली. तिच्या पोटीं विनायकानें जन्म घेतला.

विनायक हळूहळू मोठा होऊ लागला.

एकदा त्याला एक सुंदर मोर दिसला. त्याला त्याने आपले वाहन केलें. मोरावर बसलेला गणपती तो 'मयुरेश्वर' होय.

सिंधू राक्षसाचे अत्याचार वाढतच होते. मयुरेश्वरावर सिंधूने कमलासुराला पाठविलें. पण गणपतीनें त्याला त्रिशुळानें ठार

मारलें. त्याच ठिकाणीं विश्वकर्मा ह्या देवांच्या इंजिनिअरनें एक नगर वसविलें. तेंच मोरगांव होय.

नंतर स्वतः सिंधू राक्षस स्वतःच मयुरेश्वराशीं लढण्यास तयार झाला. त्याने आपल्या कल आणि विकल नांवाच्या मेहुण्यांना लढावयास पाठविलें. तेव्हां कार्तिकेयानें कल राक्षसाला ठार मारले आणि विकलाला वीरभद्रानें ठार मारले. विनायकानें आपला भाऊ कार्तिकेय याचा पराक्रम पाहून त्याला आणि त्याच्या मित्राला शाबासकी दिली.

अखेरीस स्वतः सिंधू राक्षस युद्धभूमीवर आला. अनेक दिवस दोघांचें युद्ध चालू होतें. अखेरीस गणेशानें आपलें विराट रूप धारण केलें. तें पाहून सिंधू राक्षस बेशुद्ध पडला. शुद्धीवर आल्यावर त्याला मोरावर बसलेला नेहमीचाच गजानन दिसला. गजाननानें नेम धरून त्याच्या पोटावर परशू फेकला. त्यासरशी सूर्यानें दिलेलें अमृत सिंधूच्या शरीरांतून बाहेर पडलें. त्यासरशीं तो खालीं कोसळून मरण पावला.

गणपतीनें आपला भाऊ कार्तिकेय याला मोर आवडल्यानें त्याला तो देऊन टाकला. तेव्हांपासून कार्तिकयाचें वाहन मयूर झालें आहे.



भगवान विष्णूला सिद्धि देणारा

सिद्धटेकचा सिद्धि विनायक

दोन

दौंड पासून काही मैलावर जलालापूर एस्. टी. फाट्यावर सिद्धटेक नांवाचे गाव आहे. तेथील विनायकाविषयीं पुढील कथा आहे.

एकदां ब्रह्मदेवाला खूप गर्व झाला. आपण आता सहज सृष्टी निर्माण करूं शकूं, असा त्याला गर्व वाटूं लागला. परंतु जग निर्माण करीत असतांना त्याच्यापुढें अनेक अडचणी, संकटें निर्माण झाली. तेव्हा तो अगदीं भांबावून गेला.

त्यानें गजाननाचें स्मरण केलें. तो तपश्चर्या करू लागला. एकदां त्याला स्वप्न पडलें. स्वप्नांत त्याला बाल गजानन दिसला व त्यानें त्याला गर्व सोडून देऊन शुद्ध मनानें तप आणि जप करण्यास सांगितलें.

ब्रह्मदेवानें कठोर तप आणि जप सुरू केला. तो कांहीं न खाता राहूं लागला. तेव्हा प्रसन्न होऊन विनायकानें त्याला प्रत्यक्ष दर्शन दिलें. ब्रह्मदेवानें चारी मस्तकें नम्र करून विनायकाला नमस्कार केला. सर्व अडचणी आणि संकटें दूर करून जग रचनेचें सामर्थ्य देण्याविषयीं विनायकाला प्रार्थना केली.

विनायकानें ब्रह्मदेवाला सांगितलें कीं तुझ्या इच्छा सफल होतील. माझ्या नुसत्या स्मरणानें तुझीं सर्व संकटें दूर होतील. तू खुशाल सृष्टी निर्माण कर.

विनायकाचा आशीर्वाद घेऊन तो जगाची रचना करूं लागला. कांहीं काळ तो अशी जगाची रचना करीत असता विष्णू जेथें झोपला होता, तेथून त्याच्या कानाजवळ म्हणजे अगदीं जवळ मधु आणि कैटभ नावाचे दोन राक्षस निर्माण झाले. ब्रह्मदेवाला जग रचित असता त्रास देऊ लागले. दिसेल त्या वस्तूचा नाश करू लागले. अनेक देवतांना त्यांनीं युद्धांत हरविले. फार कशाला इंद्र, चंद्र, कुबेर हे देवसुद्धां आपली राहतीं ठिकाणें सोडून त्याच्या भीतीनें दुसरीकडे पळून गेले.

विष्णू झोपेंतून जागा झाल्यावर देवांचे सैन्य बरोबर घेऊन सर्वांना त्रास देणाऱ्या त्या राक्षसांशी युद्ध करण्यासाठी निघाला. मधु आणि कैटभ या राक्षसांनीं त्याला बाहुयुद्ध म्हणजे कुस्ती खेळून जिंकण्याचें आव्हान दिलें. विष्णूने आपली सर्व हत्यारे खाली ठेवलीं व तो त्या राक्षसांशीं कुस्ती खेळूं लागला. पण दोन्ही राक्षसही काही कमी नव्हते. ते खूप शक्तिमान होते. विष्णुची आणि त्यांची कुस्ती लवकर चीतपट होईना. खूप दिवस हें मल्लयुद्ध चाललें होतें. विष्णु काहीं त्यांचा पराभव करूं शकेना तेव्हा अखेरीस कंटाळून विष्णूनें तें युद्ध बंद केलें.

त्यानें खूप विचार केला, त्याने गोड गाणाऱ्या गंधर्वांचें

रूप घेतलें. हातांत वीणा घेतली तो गाऊं लागला. त्याच्या गोड गोड आवाजानें पशु, पक्षी, मनुष्य, राक्षस आणि देव सर्वच मोहित झाले. शंकरानेंसुद्धां गाणें ऐकलें तेव्हां ते म्हणाले, "हे गंधर्वा, मी तुझ्यावर खूष झालो आहे. तूं हवा तो वर मागून घे." तेव्हा गंधर्वरूपी विष्णूने मधू-कैटभ राक्षसाची कथा शंकराला थोडक्यांत सांगितली आणि त्यांना मारण्याचा उपाय विचारला. शंकर त्यावर हसून म्हणाले, "तूं युद्ध सुरूं करण्यापूर्वी विनायकाचे स्मरण केले नाहीस म्हणून तुला जय प्राप्त झाला नाहीं. आतां तरी तूं विनायकाचें पूजन करून युद्धाला जा."

विष्णू विनायकाचे पूजन करण्यासाठीं सिद्धि क्षेत्र या ठिकाणीं गेला. त्यानें गणपतीचा मंत्र म्हणून जप केला. स्मरण आणि पूजन केल्यावर गणपती प्रसन्न झाला. गणपति-कडून त्यानें मधु आणि कैटभ राक्षसांना ठार मारण्याचा वर मागितला. गणपतीनें तो वर त्यांना दिला. नंतर वरप्राप्ती झाल्यावर तो पुन्हा मधु कैटभ राक्षस जिथें होते त्या ठिकाणीं त्यांच्याशीं लढावयास गेला. विष्णु राक्षसांच्या पराक्रमावर खूष झाला होता. म्हणून त्यांना ठार मारण्यापूर्वी तो म्हणाला, "आजपर्यंत तुमच्यासारखे योद्धे माझ्या पाहण्यांत आले नव्हते, तरी तुम्हांला हवा असेल तर एखादा वर मागून घ्या." ते दोन्हीही राक्षस, हे ऐकून खदाखदा हंसलें. विष्णूला ते म्हणाले, "जर तुलाच एखादा वर हवा असेल तर आमच्याकडून मागून

घे." विष्णु म्हणाला, "तुम्ही वर देणारच असाल तर तुम्ही माझ्या हातून मरावें असा वर द्या." नंतर विष्णूनें त्यांना ठार मारले.

विष्णूला ज्या ठिकाणीं गणपतीनें राक्षसांना मारण्याचा वर दिला तें ठिकाण म्हणजे हल्लीचे सिद्धटेक होय. विष्णूला सिद्धि देणारा येथील विनायक म्हणून तो सिद्धिविनायक होय.



बाल बल्लाळाला दर्शन देणारा

पालीचा बल्लाळेश्वर किंवा बल्लाळ-विनायक

तीन

कुलाबा जिल्ह्यांत सुधागड तालुक्यांत पाली हें गांव आहे. अगदीं देवळाच्या जवळ सरसगड आहे. पालीच्या बल्लाळेश्वराविषयीं पुढील कथा प्रसिद्ध आहे. पल्लीपूरच्या इंदुमतीला मुलगा नव्हता. माहेरीं असतांना तिनें गणपतीकथा श्रवण केली. पुढें तिला गणपतीच्या कृपेनें जो मुलगा झाला तोच बल्लाळ होय.

बल्लाळला लहानपणापासून विनायकाच्या भक्तीची आवड होती. मित्रांना जमवून तो लुटूपुटीचे गणपतीपूजन करीत असे. हा नाद त्या मुलांना इतका जडला कीं काळवेळेचा त्यांना विचारसुद्धां रहात नसे. भुकेची वेळ टळून जाई. तरी त्याची त्यांना पर्वा नसे. बल्लाळच्या संगतीनें आपल्या मुलांच्या आरोग्यांत बिघाड होत आहे. ती वाढायच्या ऐवजीं दुबळीं, हडकुळीं होत आहेत हें लक्षांत आल्यावर गांवांतल्या लोकांनी कल्याणशेटजीला आपल्या मुलाचा बंदोबस्त करायला सांगितला.

कल्याणशेटजी चिडला. त्यानें हातांत काठी घेतली. त्याने मुलांचा तो गणपती आणि त्याची आरास नष्ट करून टाकली. बल्लाळचे मित्र पळून गेले. कल्याणशेटजीनें आपल्या

मुलाला काठीनें बेदम मारले. त्याच्या अंगांतून रक्त वाहूं लागले. पण कल्याणला त्याची दया आली नाहीं. त्याने मुलाला झाडाला बांधून ठेवले. मला तूं मेलास असें सांगून तो निर्दय बाप तेथून निघून गेला. थोड्या वेळानें बल्लाळ जेव्हा शुद्धीवर आला, तेव्हा त्याला सर्व पूजा साहित्याचा नाश झालेला दिसला. त्याला खूप वाईट वाटले. तो रडू लागला. त्याने गणपतीची प्रार्थना केली. हें विनायका, तुला वाटत असेल कीं माझ्यासारख्या लहान मुलाच्या ठिकाणीं भक्तिभाव कोठून असणार ? पण तुझें चिंतन करीतच मी देह ठेवीन. बाळ बल्लाळाचा धांवा ऐकूनें प्रत्यक्ष विनायक त्याच्यासमोर प्रकट झाला. गणपतीच्या दर्शनानें त्याच्या सर्व जखमा भरून आल्या. बंधनें नष्ट झालीं. बल्लाळाचें ईश्वर म्हणजेच बल्लाळेश्वर त्याला म्हणाले, " बाळ तूं मला फार आवडतोस. तुला माझ्या भक्तीसाठीं फारच कष्ट पडले. तूं माझा खरा भक्त आहेस. तुझे मनोरथ पूर्ण होतील. तूं खूप वर्षे जगशील. "

बल्लाळला खूप आनंद झाला. तो विनायकाला म्हणाला, " माझ्या मनात सदासर्वकाळ आपलीच भक्ति रहावी आणि आम्ही मुलांनीं केलेल्या या पूजेच्या स्थानाला खरेंखुरें महत्त्व यावें. आपण या ठिकाणीं नेहमी राहून भक्तांच्या इच्छा पूर्ण कराव्यात. गणपतीनें आनंदानें आपल्या या छोट्या भक्ताच्या इच्छेला कबुली दिली. तेंच हे आजचे पालीचे गणेश--क्षेत्र बल्लाळ–विनायक किंवा बल्लाळेश्वर.



‘ गणानांत्वा ’ मंत्राचा-लेखक गृत्समदचा—

वरद विनायक

चार

कुलाबा जिल्ह्यात खालापूर या तालुक्यात ‘ महड ’ गांवीं छान झाडींत ‘ वरद विनायक ’ हें स्थान आहे. त्याची कथा पुढीलप्रमाणें आहे.

गृत्समद नांवाचा गणेशाचा भक्त असलेला एक मुनी प्राचीनकाळीं होऊन गेला. एकदां मगध देशाच्या राजाच्या घरीं श्राद्ध होतें. त्यासाठी राजानें अत्रि वसिष्ठ आणि गृत्समद इत्यादि मोठमोठ्या मुनींना बोलाविलें. त्यावेळी अत्रि मुनींनीं गृत्समदाचा अपमान केला होता. त्याचा जन्म चांगल्या रीतीनें झाला नाहीं असें म्हटलें. त्यामुळें तो चिडला. रागारागानें आईकडे येऊन त्यानें खरें कारण तिला विचारलें. वाईट आई खऱ्या बालकापुढे घाबरली. तिनें आपण पापाने वागल्याचें कबूल केले. मुलाने आईला शाप दिला कीं, तूं खूप काटे असलेली कांटेरी बोर होशील. आईचे पाप ते आपले पाप समजून तो रागारागाने अरण्ये तुडवीत निघाला. त्याच्या शापामुळे त्याची पापी आई इकडे कांटेरी बोरीचे झाड झाली.

पुष्पक नांवाच्या अरण्यात तो येऊन पोहोचला. ते शांत

झाडींनीं युक्त असें स्थान पाहून त्यानें तेथेंच तप करण्याचे ठरविलें.

पायाच्या एका अंगठ्यावर उभे राहून, नाकाच्या शेंड्याकडे नजर ठेवून त्यानें अनेक दिवस विनायकाची प्रार्थना केली. तप करतांना त्यानें फक्त झाडाची वाळलेली पानें खाल्ली.

त्याच्या खडतर तपामुळे विनायक प्रकट झाला. त्याने भक्ताला दर्शन दिलें. तो म्हणाला " मी तुझ्यावर प्रसन्न झालो आहे. तूं हवा तो वर माग."

गृत्समदाने विनायकाला नमस्कार करून म्हटले, " माझी गणना तुझ्या खऱ्या भक्तांत होऊं दे. मला ब्रह्मज्ञान होऊं दे. हें वन पवित्र आणि भक्तांना सिद्धिदायक असे कर. आणि भक्तांच्या इच्छा पूर्ण करण्यासाठीं तूं येथे रहा."

श्री. विनायक म्हणाला, " तुझ्या सर्व इच्छा पूर्ण होतील. " गणानांत्वा " या मंत्राचा तूं निर्माता झाल्यामुळे माझे स्मरण करण्यापूर्वी लोक तुझे नाव प्रथम घेतील."

नंतर गृहत्समदाने तेथे उत्तम प्रकारचे देवालय बांधले. महडचा तोच हा वरद विनायक होय.

——



इंद्राच्या हजार छिद्रांना डोळ्यांत बदल करणारा—

थेऊरचा चिंतामणी

थेऊर पुणे जिल्ह्यांत हवेली तालुक्यांत थेऊर हे गांव आहे. तेथील श्री चिंतामणी गणेशाची पुढील कथा प्रसिद्ध आहे:—

इंद्राला गौतम ऋषीने स्नान करून आल्यावर शाप दिला. कारण तो अहिल्येशीं खोटेपणाने वागला होता. शापामुळे इंद्राच्या शरिराला हजार छिद्रें पडलीं व अहिल्या शिळा झाली. पण स्वर्गांतील देवांनीं गौतमाची प्रार्थना करतांच गौतम देवांनां म्हणाले, " तुमचा इंद्र मोठा दुष्ट आहे. तो तुमचा राजा म्हणून मी त्याला फारच लहान शिक्षा केली आहे. दुसरा कोणी असता, तर त्याचे शापाने मी भस्मच केलें असतें. जर इंद्राने आता विनायकाचें स्मरण केले तर तो या शापांतून मुक्त होईल. गजाननाच्या कृपेने, माझ्या शापामुळे जी छिद्रे पडली आहेत, त्यांचे डोळ्यांत रूपांतर होईल व लोक त्याला ' सहस्राक्ष ' म्हणजे हजार डोळ्यांचा म्हणतील. "

हे ऐकून देवांनीं गौतमाला नमस्कार केला. त्यांचे समाधान झाले. नंतर ते सर्व इंद्राकडे गेले.

इंद्राला खूप हाका मारल्या. इंद्र ' इंद्रगोप ' नांवाचा किडा

झाला होता. त्याच्या शरीराला हजार छिद्रे पडलीं होती त्यांतून दुर्गंध येत होता. त्याला आपले तोंड कोणाला दाखवूं नये असें वाटत होतें. पण देवांनीं खूपच हांका मारल्यामुळें तो कमळातून बाहेर आला. तेव्हा इतकी घाण सुटली की, देवांनीं आपल्या नाकाला रुमाल लावले. त्यांनीं गौतम ऋषि प्रसन्न झाल्याचें सांगितलें. गौतमानें त्यांच्याजवळ शापानें मुक्त होण्याचा जो उपाय सांगितला होता; तो त्यांनीं इंद्राला कथन केला. बृहस्पतीनें त्याला गणपतीच्या मंत्राचा उपदेश केला.

इंद्रानें त्याप्रमाणें गणपतीचें पूजन केले. विनायकाच्या नांवाचा जप सुरूं केला. तेव्हा विनायकाच्या नाम-प्रभावानें इंद्राच्या शरारीवर असलेली छिद्रें तेजस्वी डोळ्यांत रूपांतरित झालीं. आपलें वाईट रूप विनायकाच्या प्रभावानें नाहींसें झालेलें पाहून इंद्राची विनायकावर भक्ति जडली. त्यानें एका झाडा-खालीं बसून विनायकाची पूजा करून जप करण्यास प्रारंभ केला. अशी कठोर तपश्चर्या त्याने खूप दिवस केली. विनायक त्याची ही खरी खरी भक्ति पाहून त्याच्यावर प्रसन्न झाला. त्याने प्रकट होऊन त्याला दर्शन दिलें. तेव्हा इंद्रानें विनायकाला नमस्कार करून म्हटलें, " देवा, ज्या कदंब झाडाखालीं मी आपली तपश्चर्या केली तेथें एक मोठे नगर उत्पन्न होऊ द्या. तुमचा मंत्र म्हणण्यापूर्वी ज्या सरोवरांत मी स्नान केलें, त्या सरोवराला तुमचे ' चिंतामणी ' हें नांव मिळावे. "

विनायक म्हणाले " तुझ्या सर्व इच्छा पूर्ण होतील, " देवांचा राजा इंद्र, त्याची इच्छा ज्या विनायकाने पूर्ण केली, तो हा थेऊरचा चिंतामणि होय.



पार्वतीला प्रसन्न झालेला —
लेण्याद्रिचा गिरीजात्मक

सहा

पुणे जिल्ह्यांत जुन्नर तालुक्यांत लेण्याद्रि नांवाचे डोंगरावरील स्थान आहे. येथील विनायकासंबंधीं पुढील कथा प्रसिद्ध आहे.

हिमालयाची मुलगी पार्वती, याच डोंगरावर असलेल्या एका गुहेंत आपल्याला सुपुत्र व्हावा, म्हणून कठोर तप करूं लागली. आपले मन एकाग्र व्हावे म्हणून तिनें मातीची एक मूर्ति भाद्रपद शुद्ध चतुर्थीला तयार केली. गजानन आपला पुत्र व्हावा अशी तिची इच्छा होती. तिची आपल्यावरील भक्ती पाहून पुढें त्या मातीच्या मूर्तितून प्रत्यक्ष गजानन बालरूप घेऊन प्रकट झाला. पार्वतीला मोठा आनंद झाला. तिनें त्याचें गणेश असें नांव ठेवलें. या गणेशाला ठार मारण्याचा प्रयत्न अनेक राक्षसांनीं मांजरांचीं, उंदरांचीं, घोड्यांचीं, उंटांचीं रुपें घेऊन केला.

पण गणेशानें त्या सर्वांचें कपट ओळखून त्यांना नष्ट केलें. एवढेच नव्हे, तर त्यानें शेषाचा, इंद्राचा आणि यमाचा आपल्या सामर्थ्याचा गर्व आपल्या सामर्थ्यानें नष्ट केला.

शंकराचे जे सेवक असतात त्यांना गण म्हणतात. ते सुद्धा त्याच्या आज्ञेंत वागूं लागले, म्हणून तो म्हणजे गणेश होय. गणेशाच्या बाललीलांचे क्रीडास्थान ह्या लेण्याद्रिच्या आसपास होते. गिरी म्हणजे पर्वत होय. हिमालय पर्वताची मुलगी ती गिरिजा आणि गिरिजेचा जो आत्मज म्हणजे मुलगा तो गिरिजात्मज होय. म्हणून लेण्याद्रिच्या त्या विनायकाला गिरिजात्मज म्हणतात.



सात

सुखकर्ता दुःखहर्ता विघ्ननायक—

ओझरचा विघ्नहर

पुणे जिल्ह्यांत जुन्नर तलुक्यांत ओझर नांवाचे गांव आहे. तेथील अष्टविनायकासंबंधी पुढील कथा प्रसिद्ध आहे.

खूप वर्षांपूर्वीची कथा आहे. नारद इंद्राच्या भेटीला आला

होता. नेहमींच्या कळलावी स्वभावाला अनुसरून त्यानें इंद्राला म्हटले, " हिमालय पर्वतावर एक यज्ञ चालू आहे. हा यज्ञ 'अभिनंदन' नांवाचा राजा करीत आहे. पण इतर देवता-प्रमाणे ह्या यज्ञात तो तुला तुझा भाग अर्पण करणार नाहीं असें म्हणतात."

झाले! इंद्र रागावला. त्याने काळाला बोलाविले आणि सांगितलें कीं तूं त्या यज्ञाचा नाश कर. काळाला खूप आनंद झाला. कारण कोणत्याहि गोष्टींचा नाश करणें हें काम त्याला फार आवडते. त्यानें विघ्नासुराचें रूप घेतलें. तो यज्ञाच्या मांडवात गेला. त्यानें सर्व यज्ञाचा नाश करून टाकला.

देवांनीं घाबरून गणपतीचें स्मरण केलें. गणपतीनें पार्श्व-पुत्राचें रूप घेतलें. पार्श्वाच्या पत्नीचें नाव दीपवत्सला होतें. पण पार्श्वाला आपला मुलगा देवाचा अवतार आहे हे अगोदर कळलें नाहीं. म्हणून देवांच्या बरोबर लढाईला आपल्या मुलाला पाठवायला तो तयार नव्हता, पण गणपतीनें वडिलांची कशीतरी समजूत घातली. नंतर गणपती देवांना बरो-बर घेऊन विघ्नासुराशी लढायला गेला. त्याने आपल्या अंकुशाने विघ्नासुराला पकडले. पण विघ्नासुर हा रूप घेतलेला काळ होता. स्वतःला पकडताच त्याने रूप बदललें. पण गणपतीने त्याचा सर्व गर्व नष्ट करून त्याला पराभूत केले. तेव्हा अखेरीस विघ्नासुर ऊर्फ काळ गणपतीला शरण आला. आणि म्हणाला, " हे गणराया, आता मी तुमचा भक्त झालो. मी सदैव तुमच्या

आज्ञेत राहीन पण आपण या भक्ताचे नाव धारण करावे अशी इच्छा आहे. ''

गणपतीने म्हटले, " तू म्हणतोस त्याप्रमाणे सर्व घडेल. आजपासून लोक मला विघ्नराज म्हणतील. माझे नुसते स्मरण केले तरी विघ्ने किंवा संकटे दूर पळतील. कार्यांच्या आरंभी लोक विघ्ननायका गजानना म्हणून स्मरण करतील आणि त्यांचे कार्य सिद्धीस जाईल. "

नंतर देवांनी भाद्रपद शुद्ध चतुर्थीला दुपारच्या वेळी गणपतीची स्थापना केली. तेच हे ओझरचे विघ्नहर गजानन मंदिर होय.

— —



त्रिपुरासुराला ठार मारण्याची शंकराला
प्रेरणा देणारा

रांजणगांवचा गणपती

आठ

पुणे जिल्ह्यात शिरूर तालुक्यात रांजणगांव नावाचे अष्ट विनायकाचे स्थान आहे. त्यासंबंधी पुढील कथा प्रसिद्ध आहे.

गजाननाच्या वरामुळे त्रिपुरासूर जग जिंकायला निघाला व त्याने आपल्या पराक्रमाने प्रथम मृत्युलोक जिंकला. नंतर त्याने इंद्राचा पराभव केला. तेव्हा सर्व देव घाबरून हिमालयाच्या दरीत जाऊन बसले. इंद्राची राजधानी अमरावती त्याच्या हाती आली. त्याने समारंभपूर्वक वाजत-गाजत नगरात प्रवेश केला. मोठ्या रूबाबात तो इंद्राच्या आसनावर जाऊन बसला. त्याने स्वर्गाचे देवांकडे असलेले अधिकार राक्षसांना देऊन टाकले, त्याने नंतर कैलास पर्वतावर स्वारी केली. तो त्याच्या सैन्याच्या पराक्रमामुळे कंप पावू लागला. पण शंकरांना आनंद झाला. त्यांनी प्रसन्न होऊन त्याला म्हटले की, ‘ वर माग. ’ त्याने कैलास पर्वताची मागणी केली. भोळ्या शंकराने पर्वत त्याला देऊन टाकला आणि पार्वतीसह ते मंदार पर्वताकडे गेले.

त्रिपुराचा एक सेनापती भीमकाय नावाचा होता. त्याने मृत्युलोक म्हणजे पृथ्वीवरील लोकांचा छळ आरंभला. नानाप्रकारचे अत्याचार तो करू लागला. चांगल्या गोष्टी नष्ट करू लागला. वाईट गोष्टींना उत्तेजन देऊ लागला.

त्याचा दुसरा सेनापती वज्रदंष्ट्र पाताळात गेला होता. त्याने तेथेही खूप अत्याचार केले. जिकडे तिकडे दुःख, दारिद्र्य आणि अत्याचार याचेच जणू राज्य चालू होते. परंतु अशा वेळी सर्व देव एकत्र आले. तेव्हा नारद तेथे आला आणि तो त्यांना म्हणाला, “ देवांनो ! त्रिपुरासूर एवढा माजला आहे, त्याला कारण त्याला शंकराशिवाय कोणीच ठार करू शकणार नाही. म्हणूनच तो

कोणाचाही पराभव करू शकतो. तेव्हा तुम्ही गजाननाला प्रसन्न करून घ्या. '' त्याप्रमाणे देवांनी गजाननाची मनापासून प्रार्थना केली. गजानन प्रसन्न झाला आणि त्याने ब्राह्मणाचे रूप घेतले व तो त्रिपुरासुराकडे गेला. तेव्हा त्रिपुरासुराने त्याला विचारले की, तू कोण ? कशाकरता येथे आलास ? तेव्हा ब्राह्मणरूपी गणपती म्हणाला, मला चौसष्ठ कला येतात. त्रिपुरासुर म्हणाला, मला जर तुझी कला पसंत पडली तर मी माझे प्राणसुद्धा तुला देईन. तेव्हा ब्राह्मण म्हणाला, मी तुला माझ्या कलेच्या जोरावर तीन विमाने करून देतो. त्यात बसून तू कोठेही जाऊ शकशील. त्या विमानांचा नाश शंकराशिवाय कोणीही करू शकणार नाही. परंतु शंकराने एकच बाण जरी मारला तरी त्यामुळे विमानाचा आणि तुझा दोघांचाही नाश होईल. त्याच्या कलेवर त्रिपुरासुर खुष झाला. त्याने त्याला १० गावे बक्षासे दिली व त्या ब्राह्मणाने मागितलेली चिंतामणिची मूर्ति शंकराकडे दूत पाठवून मागविली. पण शंकराने ती मूर्ती त्याला दिली नाही. त्याला खूप राग आला. त्याने मंदार पर्वतावर स्वारी केली. जाताना तो गजाननाचे पूजन करण्यास विसरला. अखेरीस शंकराने गजाननाचे स्मरण करून त्याच्याशी युद्ध सुरू केले. राक्षसांनी अंगात लोखंडी अंगरखे म्हणजे चिलखते घातली होती. ते मोठमोठ्याने आरडाओरडा करू लागले. अनेक देव आणि अनेक राक्षस ठार झाले. कोणी हत्तीवरून खाली पडला तर कोणी घोड्यावरून पडला; तर कोणी रथातून खाली पडला. त्रिपूरासुराने

मंत्र म्हणून एक बाण इंद्राच्या सैन्यावर टाकला. त्या बाणाने देव बेशुद्ध झाले. सूर्यसुद्धा झाकळून गेला. अखेरीस शंकराने पुन्हा एकदा गणेशाचे नाव घेऊन स्वतः हातात धनुष्यबाण घेतला. नेम धरून त्याने बाण सोडला. तेव्हा त्रिपुरासुराला तो लागला आणि तो ठार झाला. सर्व दुःख नाहीसे झाले. इंद्र आणि देव स्वर्गात अमरावतीला गेले.

शंकराने जेथे गजाननाचे नाव घेतले होते; त्या ठिकाणी ज्या गजाननाची स्थापना केली होती, तोच रांजणगावचा गणपती होय.



प्रत्येक ठिकाणच्या देवळाचे थोडक्यात वर्णन

१] मोरगाव—देवळाचे तोंड उत्तरेकडे आहे. ११ दगडी पायऱ्या मंदिराला आहेत. देवळात प्रवेश केल्याबरोबर संगमरवरी फरशी दिसते. चौकातच २ दिपमाळा आहेत. चौकातच गणपतीकडे तोंड केलेला उंदीर आहे. सभामंडपाला २ मोठी प्रवेशद्वारे आहेत. देवळाजवळच नगरखान्याची इमारत आहे. देवळाच्या

चारही बाजूचा कोट ५० फूट उंच आहे. मयुरेश्वराच्या डोळ्यात व बेंबीत खरे हिरे बसविले आहेत. मस्तकावर नागाची फणा आहे.

२] सिद्धटेक—गाभारा १५ फूट उंच आहे. विनायका-भोवतीचे मखर व महिरप पितळेचे आहे. सिंहासन दगडी आहे. आतील गाभारा अहिल्याबाई होळकर यांनी बांधला आहे. बाहेरचा मोकळा सभामंडप बडोद्याच्या नारायण मैसळ यांनी बांधला आहे. मोरया गोसावी यांनी येथे प्रथम तपश्चर्या केली. भाद्रपद व माघी चतुर्थीस मोठ्या प्रमाणावर उत्सव साजरे होतात. काका गाडगीळांनी त्यांचे आजोळ तेथे आहे म्हणून काही वर्षांपूर्वी प्रवाशांसाठी धर्मशाळा बांधली आहे.

३] पाली—गाभारा १५ फूट उंच आहे. उंदराची मूर्ति हातात मोदक घेऊन उभी आहे. सभामंडप ४० फूट लांब आहे. देवळासमोर २ तळी आहेत. पण अव्यवस्थित वापरामुळे ती सदा शेवाळलेली असून तोंडात पाणी घेऊ नये असे वाटते. मूर्ति ३ फूट उंच असून सिंहासन दगडी आहे. डोळ्यात व बेंबीत खरे हिरे असून त्यावर ऋद्धी-सिद्धीच्या मूर्ती चवऱ्या ढाळीत आहेत. माघांतील उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा होतो. एक मोठी घंटा देवळात आहे ती श्रीमंत चिमणाजी अप्पा पेशवे यांनी दिली आहे. सभामंडपात दोन मोठाले हत्ती आहेत.

४] महड—दाट झाडांच्या राईत, टुमदार झोपड्यांच्या

जवळ पूर्वेकडे तोंड असलेले हे मंदीर आहे. मंदिराच्या मागील बाजूला मोठे तळे आहे. पाण्याने ते तुडूंब भरलेले असून त्यात कमळे फुललेली असतात. पण शेवाळाच्या थरामुळे त्यांची शोभा जाणवत नाही. गणपतीची मूर्ती उजव्या सोंडची आहे. दगडी सिंहासनावर ती बसलेली आहे. सभामंडप ८ फूट लांबी-रुंदीचा चौरस आहे. बाहेरचा सभामंडपही ४० फूट लांब-रुंद असा आहे. देऊळ एखाद्या कौलारू घरासारखे लांबून दिसते. हल्लीची मूर्ती मागच्या तळ्यात १६९० साली पौडकर गुरवाला सापडली असे म्हणतात. पेशव्यांच्या वेळी कल्याणचे बिवलकर यांनी १७२५ साली हे देऊळ प्रथम बांधले. १८९२ सालापासून या देवळातील नंदादीप आजपर्यंत अखंड तेवत आहे हे येथील वैशिष्ट्य होय.

५] थेऊर—देवळाचा मुख्य दरवाजा उत्तरेकडे असला तरी गणपतीची मूर्ती पूर्वेकडे तोंड केलेली आहे. तो डाव्या सोंडेचा आहे. थोरले माधवराव पेशवे यांनी देवळाचा सभामंडप बांधला. पुण्यात राहून जवळात जवळ असलेला अष्टविनायकापैकी चिंतामणी हा माधवरावांना फार प्रिय होता. त्यांनी स्वतःसाठी देवळाजवळच वाडा बांधला होता. थोरले माधवराव येथेच तरूणपणी मराठी राज्याचे अपार कष्ट वाहून क्षयाने मरण पावले. त्यांची पत्नी रमाबाई सती गेली. तिची समाधीही नदीकाठी अजून आहे. मोरया गोसाव्याने येथेच गणपतीची तपश्चर्या केली होती.

६] लेण्याद्रि—ह्या देवळाचे दार दक्षिणेकडे आहे. हे डोंगरात कोरलेले देऊळ असल्याने याला लेणीहि म्हणतात. देवळाच्या बाजूला ओवऱ्या कोरलेल्या आहेत. बाहेरील सभामंडप ओलांडून गेले की ८ कोरीव खांब आहेत. थोडेसे चालून पायऱ्या उतरून गेल्यावर बुद्धाचा स्तूप किंवा भीमाची गदा लागते. गदेवर वाघ-सिंह वगैरे प्राण्यांची तोंडे कोरलेली अ हेत. जवळच प.ण्याची दोन टाकी आहेत. देवाचे मखर लाकडी असून ते नुकतेच म्हणजे १५।१६ वर्षांपूर्वी तयार केले आहे. माघ महिन्यात विशेष मोठ्या प्रमाणात उत्सव होतो. लेण्यापासून शिवनेरी किल्ला जवळच आहे.

७] ओझर — पूर्वेकडे तोंड असलेले मुख्य दार आहे. गणपती डाव्या सोंडेचा आहे. डोळ्यात दोन तेजस्वी रत्ने असून कपाळावर हिरा बसविला आहे. त्यामुळे गणपतीचे तेज अधिकच झळकते. दोन्ही बाजूला पितळेच्या ऋद्धिसिद्धीच्या मूर्ती आहेत. सभामंडप साधारण ८।१० फूट लांब-रुंद असावा. दरवाजाशीच असलेला काळा उंदीर जणू पळतोच आहे असे वाटते. त्रिपुरी पौर्णिमेपासून चतुर्थीपर्यंत ५ दिवस देवळ.बाहेर असलेल्या २ दीपमाळा पाजळत असतात.

८] रांजणगाव—देऊळ एस. टी. स्टँडपासून २ फर्लांगावर आहे. सडक सोडून डाव्या बाजूला पायवाटेने गेले कीं देवळाचा कळस दिसू लागतो. दरवाजा पूर्वेकडे तोंड केलेला असून डाव्या बाजूची आणि मागील बाजूची पडझड झाली

आहे. मात्र देवळाचा मुख्य गाभारा आणि मंडप शाबूत आहे. मराठेशाहीतील अनेक सरदारानी या देवळाला इनामे दिली होती. देवळातल्या प्रत्यक्ष मूर्तीचा आणि बाहेरचा असे दोन्हीहि गाभारे थोरले माधवराव पेशवे यांनी बांधलेले आहेत. उजव्या सोंडेचा हा विनायक आहे. खरी मूर्ती खाली तळघरात आहे आणि तिला १० सोंडी आणि २० हात आहेत असे सांगतात.

अष्टविनायक उत्सव-विशेष

(१) महडः– माघ शुद्ध चतुर्थीस.

(२) पालीः– येथेही माघ शुद्ध चतुर्थीस व दर चतुर्थीस भक्तांची विशेष गर्दी जमते.

(३) ओझरः– भाद्रपद शुद्ध चतुर्थीस मोठा उत्सव होतो.

(४) रांजणगावः– भाद्रपद शुद्ध चतुर्थीस मोठा उत्सव होतो. दर चतुर्थीलाही भक्तांची विशेष गर्दी जमते.

(५) मोरगावः– भाद्रपद शुद्ध चतुर्थीस मोठा उत्सव होतो. मोरगावला चिंचवडहून पालखी भाद्रपद चतुर्थीस व माघी चतुर्थीस मोठ्या समारंभाने आणतात.

(६) सिद्धटेकः– भाद्रपद व माघी चतुर्थीस मोठ्या प्रमाणात उत्सव साजरा केला जातो.

(७) लेण्याद्रिः– माघी चतुर्थीस मोठ्या प्रमाणात उत्सव साजरा केला जातो.

(८) थेऊरः— भाद्रपद चतुर्थीस मोठ्या प्रमाणात उत्सव साजरा केला जातो.

अष्टविनायकांचा इतिहासकालीन उल्लेख

(१) ओझरः— वसई जिंकून चिमाजीअप्पा पेशवे ओझर-वरून पुण्यास परतत असता त्यांनी श्रींचे दर्शन घेतले आणि मंदिराचा जीर्णोद्धार केला.

(२) रांजणगावः— छत्रपती शाहूमहाराज यांनी या मंदिराला व्यवस्थेसाठी पहिली सनद दिली व थोरले माधवराव पेशवे यांनी हा गाव व्यवस्थेसाठी इनाम दिला.

(३) थेऊरः— थोरले माधवराव पेशव्यांनी हा गाव व्यवस्थे-साठी इनाम दिला.

(४) सिद्धटेकः— येथील मंदिर अहिल्याबाई यांनी बांधले. पेशव्यांचे सरदार हरिपंत फडके यांचा येथे वाडा आहे.

(५) महडः— पेशव्यांचे वेळी कल्याणचे सरसुभेदार बिवल-कर यांनी १७२५ साली हे देऊळ प्रथम बांधले.

(६) पालीः— चिमाजीअप्पा पेशवे यांनी येथील मंदिराला एक मोठी घंटा दिली व जीर्णोद्धार केला.

(७) लेण्याद्रिः—छत्रपती शिवाजी या गणेशाच्या दर्शनाला जात असत.

अष्टविनायकांजवळील कांही प्रेक्षणीय स्थळे

अष्ट विनायकांचे दर्शन घेताना अगदी सहजपणे जाता येतील अशी काही स्थळे—

(१) थेऊर :—ता. हवेली, जि. पुणे-- थोरले माधवराव पेशव्यांच्या पत्नी रमाबाई यांची सतीसमाधि नदी तीरावर आहे. माधवरावांचा पडका वाडा पाहून मन खिन्न होते.

(२) उन्हेरे :— पाली, ता. सुधागड, जिल्हा कुलाबा. या अष्टविनायकाच्या स्थानाजवळ उन्हेरे हे एक रमणीय गरम पाण्याचे झरे असलेले ठिकाण आहे. येथे दोन गरम पाण्याची कुंडे असून कुलाबा जिल्हा परिषदेने येथे उतरण्यासाठी टुमदार अशी इमारत बांधली आहे. तेथे अल्प भाड्यात स्टोव्हपासून जेवणा-खाणा-झोपण्याचे साहित्य भाड्याने देण्याची सोय करण्यात आली आहे. तेथे श्रीविठ्ठल-रखुमाई मंदिर असून भोवतालचा परिसर मोठा रम्य आहे. पालीपासून हे ठिकाण २ मैलावर आहे.

(३) शिवनेरी किल्ला:— जुन्नरजवळ दीड मैलावर हा किल्ला आहे. महाराष्ट्र सरकारने येथे खास व्यवस्था ठेवली आहे. बाल शिवाजी, जिजाबाई यांचे पुतळे सरकारने येथे उभारले आहेत. येथे किल्ल्यावर गंगा आणि यमुना नावाची दोन थंड पाण्याची तळी आहेत. शिवाईचे मंदिर आणि भोवतालचा रम्य परिसर पहाण्यासारखा आहे.

मुंबईपासून अष्ट विनायक स्थानांचे अंतर

(१) पाली :—८७ मैल. मुंबई ते पाली व्हाया पनवेल, पेण किंवा थेट मुंबई ते पाली. एस्. टी. ने.

(२) महाड :—६२ मैल. मुंबई–ठाणे–पनवेल चौक या रस्त्याने एस्. टी. ने.

(३) लेण्याद्रि :—१४८ मैल. एस्. टी. ने जुन्नरपर्यंत १४५ मैल व जुन्नरहून लेण्याद्रि ३ मैल.

(४) ओझर :—१५० मैल. मुंबई ते नारायणगांव या मार्गावर जुन्नरपासून ५ मैलावर एस्. टी. ने.

(५) रांजणगाव :--१५१ मैल. १२० मैल मुंबई–पुणे रेल्वेने आणि पुण्याहून ३१ मैल एस्. टी. ने.

(६) मोरगाव :--१५६ मैल. १२० मैल मुंबई–पुणे रेल्वेने. पुण्यापासून जेजुरीमार्गे एस्. टी. ने. ३६ मैल.

(७) थेऊर :--१३१ मैल. १२० मैल मुंबई–पुणे रेल्वेने व ११ मैल पुण्यापासून एस्. टी. ने.

(८) सिद्धटेक :--२२२ मैल. १२० मैल मुंबईपासून पुणे. पुढे रेल्वेने दौंड व दौंड ते जलालपूर एस्. टी. ने १०१ मैल.

म्हणजे अंदाजे अष्ट विनायकांचे मुंबईपासून एकूण अंतर ११०७ मैल; प्रत्येक स्थानांचा स्वतंत्रपणे विचार करून !

पुण्यापासून अष्ट विनायक स्थान अंतर

(१) मोरगाव पुण्यापासून चाळीस मैल आहे. (२) सिद्धटेक पुण्यापासून एकशे एक मैल आहे. (३) पाली पुण्यापासून सत्तर मैल आहे. (४) महड पुण्यापासून सेहेचाळीस मैलावर आहे. (६) लेण्याद्रि पुण्यापासून सत्तावन्न मैलावर आहे. (७) ओझर पुण्यापासून बावन्न मैलावर आहे. (८) रांजणगाव पुण्यापासून एकतीस मैलावर आहे. म्हणजे पुण्यापासून एस. टी. ने सर्व अष्ट विनायक असलेल्या गावांचा एकूण प्रवास चारशे अकरा मैलांचा आहे.

महाराष्ट्रातील अन्य जागृत गणेश स्थाने

(१) गणपती मुरुड :–(जंजिरा) कुलाबा जिल्ह्यातील हे ठिकाण मुरुड बंदरापासून साधारणपणे पांच मैलावर आहे. किंवा एस. टीने जाता येते. कांही लोक या स्थानाला अष्टविनायकापैकी मानतात. भाद्रपद आणि माघ महिन्यात येथे मोठा उत्सव होतो.

(२) पुळ्याचा गणपती--रत्नागिरी जिल्ह्यात हे ठिकाण आहे. रत्नागिरीपासून तीस मैलावर समुद्रापासून हे रम्य स्थान आहे. एस. टी. ची सोय आहे. मुंबईहून बोटीने तिवरी बंदरास उतरल्यास तिथून फक्त पांच मैलावर हे स्थान आहे. येथील

धर्मशाळा थोरल्या माधवरावांच्या पत्नी रमाबाई यांनी बांधल्या आहेत. भाद्रपद व माघ महिन्यात शुक्ल प्रतिपदेपासून पंचमी-पर्यंत थाटाने उत्सव साजरा होतो.

(३) टिटवाला महा गणपती--ठाणे जिल्ह्यात कल्याणजवळ हे ठिकाण आहे. टिटवाला नावाच्या रेल्वे स्थानकापासून गणेश मंदिर २ मैलावर आहे. पेशवेकालीन हा गणेश असून भोवता-लचा परिसर निसर्गरम्य आहे. मुंबईकरांमुळे दर गणेश चतुर्थीस येथे जणू यात्राच भरते.

(४) कडावचा गणपती :-- कुलाबा जिल्ह्यातील कर्जत तालुक्यात. कर्जतपासून सुमारे दहा मैलावर कडाव नावाचे गाव आहे. नाना फडणवीसांनी येथील मंदिराचा जीर्णोद्धार केला होता. कर्जतहून एस. टी. ने येथे जाण्याची सोय आहे.

(५) चिंचवडचा गणपति :-पुणे जिल्ह्यातील चिंचवड या रेल्वे स्थानकापासून सुमारे दोन मैलावर प्राचीन पेशवे कालीन मंदिर आहे. मार्गशिर्ष वद्य षष्ठीला येथे मोठी यात्रा भरते. दर संकष्ट चतुर्थीला येथे गर्दी असते.

(६) हेदवीचा दशभुजा गणपती :-रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर तालुक्यात हे पेशवकालीन गणेश मंदिर आहे. दहा भुजा असणारा गणेश हे येथील वैशिठ्य होय. त्याच्या गळ्यात नागाचे जानवे असून मांडीवर सरस्वती बसलेली असावी. उतर-ण्यास सुंदर धर्मशाळा असून भोवताली उंचच उंच डोंगर आहेत. गुहागरपर्यंत एस. टी. ने व गुहागर ते हेदवी हे बारा मैल

अंतर मिळेल त्या साधनांनी पार करावे लागते, माघी चतुर्थीस येथे मोठा उत्सव होतो.

(७) सारस बागेतील गणपती :—पुण्यातील पर्वतीच्या पायथ्याशी पेशवेकालीन हे मंदिर असून ते सारस बागेच्या रम्य उद्यानात आहे. गणपती तळ्याच्या भोवतीचा परिसर पुणे महानगरपालिकने रम्य उद्यानात परिवर्तीत केल्याने हे गणेश स्थान विलोभनीय झाले आहे.

(८) कसबा गणेश :—पुणेकरांची ही ग्रामदेवता असून छत्रपती शिवरायांच्या पुण्यातील राहत्या वाड्याजवळ आहे. मंदिरं इतिहास-कालिन असून छत्रपति शिवराय व जिजाबाईसाहेबही मंदिराला भेट देऊन गणेशाची पूजा–अर्चा करीत असत.

पुण्याहून एस. टी. गाड्या सुटण्याच्या जागा

मोरगाव, महड आणि थेऊर या तीन ठिकाणी जाणाऱ्या गाड्या स्वारगेट एस. टी. डेपोतून सुटतात तर सिद्धटेक, पाली लेण्याद्रि, ओझर आणि रांजणगाव या पाच ठिकाणी जाणाऱ्या गाड्या शिवाजीनगर एस. टी. डेपोतून सुटतात. अर्थात या ठिकाणी जाणाऱ्या गाड्या अनेक असल्या तरी येथे फक्त अष्ट-विनायक स्थानाला जवळ पडणारी आणि सोयीची गाडी फक्त शक्यतो विचारात घेतली आहे.

पुण्याहून अष्ट विनायक स्थानीं एस. टी. गाड्या सुटण्याच्या वेळा व मार्ग

(१) मोरगावः— मोरगांवाला जाण्यासाठी सोयीची गाडी सकाळी सात वाजता आहे. जेजुरी मार्गाने ती गाडी जाते. गाडी मोरगावाला स्टँडवर थांबते.

(२) सिद्धटेकः—सिद्धटेकला जाण्यासाठी दौन्डला उतरणे फायद्याचे आहे. येथपर्यन्त रेल्वेने वा मोटारने आल्यावर दौंड एस. टी. स्टँडवरून जलालपूर फाट्याने जाणारी शक्यतो सकाळची मोटार पकडावी म्हणजे येताना (मुक्काम करायचा नसेल तर) एस. टी. मिळून दौंडला मुक्काम करता येतो. जलालपूर फाट्यावर उतरून सुमारे दोन मैल शेताडीतून वा रस्त्याने पायी चालत जावे लागते म्हणजे मग क्षेत्र सिद्धटेक लागते. दौन्डच्या पुढील स्टेशनावर उतरणे आर्थिक दृष्टीने व सोईच्या दृष्टीने तापदायक आहे.

(३) पाली— पालीला जाण्यासाठी सकाळी सात वाजता पुणे रोहा गाडी सुटते. ती गाडी मुंबई मार्गाने कर्जत फाट्यावरून पालीला जाते. पालीला गावातच स्टँड आहे.

(४) महडः—महडला जाण्यासाठी सकाळी साडे सहा वाजता पुणे—ठाणे गाडी आहे. ती मुंबई मार्गाने जाते आणि महडपासून एक मैल अंतरावर रस्त्यावर उतरावे लागते. तेथून सहज चालत महडला जाता येते.

(५) थेऊरः— थेऊरला जाण्यासाठी पुण्याहून गावत जाणारी

अशी एकच गाडी आहे ती म्हणजे पुणे–चोराची आळंदी ही गाडी होय. पुण्याहून सकाळी साडे नऊला सुटते. मार्ग सोलापूर रोड होय.

(६) लेण्याद्रि—लेण्याद्रीला जाण्यासाठी प्रथम सकाळी सहा वाजता पुणे जुन्नर गाडी पकडावी लागते. ती जुन्नरला साधारण नऊ वाजता पोहाचते. जुन्नरहून सकाळी सव्वा नऊ वाजता ओतूरला जाणारी गाडी अहे त्या गाडीने ठाकूरवाडी माथा या स्टॉपवर उतरणे. ही गाडी जुन्नर मार्गाने जाते.

(७) ओझर—ओझरला जाण्यासाठी प्रथम सकाळी पांच वाजता पुणे शिर्डी गाडी पकडावी लागते. ती गाडी साधारणपणे साडेआठच्या सुमाराला नारायणगावला पोहोचते. तेथे उतरून नारायणगाव ते ओझर या गाडीने थेट ओझरपर्यंत जाता येते. ही गाडी साधारण नऊ वाजता नारायणगावहून सुटते. ती गाडी जुन्नर मार्गानेच जाते.

(८) रांजणगावः—रांजणगावला जाण्यासाठी जरी अनेक गाड्या असल्या तरी सकाळी सव्वा सहा किंवा सव्वा सात वाजता जाणाऱ्या पुणे शिरूर गाड्या सोयीच्या वाटतात. ह्या गाड्या नगर मार्गाने जातात.

मोटार गाड्यांच्या वेळांमध्ये थोडाफार बदल दरवर्षी केला जातो तरी प्रवासापूर्वी संबंधीत एस. टी. बस स्टँडशी संपर्क साधावा म्हणजे मग गैरसोय होणार नाही.

अष्टविनायकाहून पुण्यास परत येण्याच्या वेळा आणि इतर सूचना

मोरगावाहून दुपारी १ ला परत येण्यासाठी गाडी आहे. सिद्धटेकला एका दिवसात जाऊन येणे अशक्य आहे. म्हणून रात्री तेथे मुक्काम करावा. पालीहून दुपारी चारला परत येणारी गाडी आहे. थेऊरहून येणारी १२॥ ची गाडी आहे. लेण्याद्रि-हून परत ३॥ च्या सुमाराला निघून जर आपण जुन्नरला ४॥ पर्यंत पोहोचलो तर जुन्नरहून ४॥ ची गाडी आहे. ओझरहून नारायणगावला जाणारी येणारी एकच गाडी असल्याने ज्या गाडीने आपण जातो तीच नऊची गाडी १ तास थांबून १० वाजता परत ओझरहून नारायणगावला निघते. आणि नारायण-गावाहून पुण्याला येणाऱ्या अनेक गाड्या असल्या तरी एक्सप्रेस असलेल्या गाड्या तेथे थांबत नाहीत. त्यामुळे १२ ते १ च्या सुमाराला शिरूर पुणे गाड्या अगर ४ ते ५ च्या सुमाराला शिरूर पुणे गाड्याच पकडाव्यात.

सिद्धटेक, मोरगाव, लेण्याद्रि व ओझर या ठिकाणी शक्यतो पावसाळ्यात जाऊ नये. वाटेत नदी--नाले असल्याने यातील काही मार्ग तात्पुरते वाहतुकीस बंद होतात अगर वाहतुकीस पाणी ओसरेपर्यंत विलंब लागतो. इतर ठिकाणी मात्र कोणत्याहि ऋतूत गेले तरी चालते. ही सर्व अष्ट विनायकांची स्थाने गाववजा असल्याने कच्चे रस्ते आणि उतरण्याच्या गैरसोयी आढळतात. आमच्या अनुभवारून आम्ही असे नम्रपणे सांगू

इच्छितो की पाली आणि महड यासाठी २ दिवस घालवावेत प्रथम पालीला जावे गाव मोठे असल्याने उतरण्याची सोय असून भोजनालयेही आहेत. दुसऱ्या दिवशी पुण्याहून थेट लेण्याद्रिसाठी जुन्नर गाडीत बसावे. हवा तर मुक्काम जुन्नरला करावा व दुसऱ्या दिवशी सकाळी ओझरला जावे. परत संध्याकाळी मुक्कामास पुण्यास यावे.

थेऊर, मोरगाव व रांजणगाव ही सकाळी जाऊन संध्याकाळी परत पुण्याला येण्यासारखी ठिकाणे आहेत. सिद्धटेकला केवळ स्वतंत्रच जावे लागते व मुक्काम करावा लागतो. व्यवस्थित व्यक्तिगत अष्ट विनायक यात्रा करावयाची असल्यास ९ दिवस लागतात.

कांही गणेशव्रते

(१) प्रत्येक महिन्यातील शुद्ध पक्षाच्या चतुर्थीस विनायकी चतुर्थी म्हणतात. या दिवसाचा उपवास दुसऱ्या दिवशी सोडतात. (२) प्रत्येक महिन्यातील वद्य पक्षातील चतुर्थीस संकष्टी चतुर्थी म्हणतात. या दिवशी केलेला उपवास त्याच दिवशी चंद्रोदय होताच सोडतात. (३) वरील दोन्हीपैकी कोणतीहि चतुर्थी मंगळवारी असल्यास तिला अंगारकी म्हणतात आणि शुक्रवारी आल्यास तिला दशरथ-स्थळी असे म्हणतात.

सार्थ श्रीगणपति अथर्वशीर्ष

श्रीगणेशाय नमः ॐ भद्रं कर्णेभिः शृणुयाम देवा भद्रं पश्येमाक्षभिर्यजत्राः । स्थिरैरंगैस्तुष्टुवांसस्तनूभिर्व्यशेम देवहितं यदायुः ।। ॐ स्वस्तिनऽइंद्रोवृद्धश्रवाः स्वातिनः पूषा विश्ववेदाः । स्वास्तिनस्ताक्ष्योऽअरिष्टनेमिः स्वस्तिनो बृहस्पातिर्दधातु ।। ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः

ॐ नमस्ते गणपतये । त्वमेव प्रत्यक्षं तत्त्वमसि । त्वमेव केवलं कर्तासि । त्वमेव केवलं धर्तासि । त्वमेव केवलं हर्तासि । त्वमेव सर्वं खल्विदं ब्रह्मासि । त्वं साक्षादात्मासि नित्यं ।।१ ।। ऋतं वच्मि । सत्यं वच्मि ।। २ ।। अव त्वं माम् । अव वक्तारम् । अव श्रोतारम् । अव दातारम् । अव धातारम् । अवानूचानमव शिष्यम् । अव पश्चात्तात् । अव पुरस्तात् । अवोत्तरात्तात् । अव दक्षिणात्तात । अव चोर्ध्वातात् । अवाधरात्तात् । सर्वतो मां पाहि पाहि समंतात् ।। ३ ।। त्वं वाङ्मयस्त्वं चिन्मयः । त्वमानंदमयस्त्वं ब्रह्ममयः । त्वं सच्चिदानंदाद्वितीयोऽसि त्वं प्रत्यक्षं ब्रह्मासि । त्वं ज्ञानमयो विज्ञानमयोऽसि ।। ४ ।। सर्वं जगदिदं त्वत्तो जायते । सर्वं जगदिदं त्वत्तस्तिष्ठति । सर्वं जगदिदं त्वयि लयमेष्यति । सर्वं जगदिदं त्वयि प्रत्येति । त्वं भूमिरापोऽनलो ऽ निलो नभः। त्वं चत्वारि वाक्पदानि ।। ५ ।। त्वं गुणत्रयातीतः । त्वं देहत्रयातीतः । त्वं कालत्रयातीतः । त्वं मूलाधारस्थितोऽसि नित्यम् । त्वं शक्तित्रयात्मकः । त्वां योगिनो ध्यायन्ति नित्यम् । त्वं ब्रह्मा त्वं विष्णुस्त्वं रूद्रस्त्वमिंद्रस्त्वमग्नि-

त्स्वं वायुस्त्वं सूर्यस्त्वं चंद्रमास्त्वं ब्रह्मभूर्भुवः स्वरोम् ॥ ६ ॥ गणादिं पूर्वमुच्चार्य वर्णादिं तदनंतरम् । अनुस्वारः परतरः । अर्धेन्दुलसितं । तारेण ऋद्धं । एतत्तव मनुस्वरूपम् । गकारः पूर्वरूपम् । अकारो मध्यमरूपम् । अनुस्वारश्चांत्यरूपम् । बिंदु-रुत्तररूपम् । नादः संधानम् । संहिता संधिः । सैषा गणेशविद्या गणक ऋषिः । निचृद्गायत्रीच्छंदः । गणपतिर्देवता । ॐ गं गणपतये नमः ॥ ७॥ एकदंताय विद्महे वक्रतुण्डाय धीमहि । तन्नो दंतिः प्रचोदयात् ॥ ८ ॥ एकदंतं चतुर्हस्तं पाशमंकुशधारिणम् । रदं च वरदं हस्तैर्बिभ्राणं मूषकध्वजम् । रक्तं लंबोदरं शूर्पकर्णकं रक्तवाससम् । रक्तगंधानुलिप्तांगं रक्तपुष्पैः सुपूजितम् । भक्तानुकंपिनं देवं जगत्कारणमच्युतम् । आविर्भूतं च सृष्ट्यादौ प्रकृतेः पुरुषात्परम् । एवं ध्यायति यो नित्यं स योगी योगिनां वरः॥९॥ नमोव्रातपतये नमो गणपतये नमः प्रथमपतये नमस्ते अस्तु लंबोदरायैकदंताय विघ्ननाशिने शिवसुताय वरदमूर्तये नमः॥१०॥

एतदथर्वशीर्षं योऽधीते । स ब्रह्मभूयाय कल्पते । स सर्वविघ्नैर्न बाध्यते । स सर्वतः सुखमेधते । स पंचमहापापात्प्रमुच्यते सायमधीयानो दिवसकृतं पापं नाशयति । प्रातरधीयानो रात्रिकृतं पापं नाशयति। सायं प्रातः प्रयुंजानो अपापो भवति । सर्वत्राधीयानोऽपविघ्नो भवति। धर्मार्थकाममोक्षं च विंदति । इदमथर्वशीर्षमशिष्यायं न देयं: । यो यदि मोहाद्दास्यति स पापीयान् भवति । सहस्रावर्तनात् । यं यं काममधीते तं तमनेन साधयेत । अनेन गणपतिमभिषिंचति । स वाग्मी भवति । चतुर्थ्यामनश्नञ्-

पति स विद्यावान भवति। इत्यथर्वणवाक्यम्। ब्रह्माद्यावरणं विद्यात्। न बिभेति कदाचनेति। यो दूर्वांकुरैर्यजति। स वैश्रवणोपमो भवति। यो लाजैर्यजति स यशोवान्भवति। स मेधावान्भवति। यो मोदकसहस्रेण यजति स वांछितफलमवाप्नोति। यः साज्यसमिद्भिर्यजति स सर्वं लभते स सर्वं लभते। अष्टौ ब्राह्मणान् सम्यग्ग्राहयित्वा सूर्यवर्चस्वी भवति। सूर्यग्रहे महानद्यां प्रतिमा संनिधौ वा जप्त्वा सिद्धमंत्रो भवति। महाविघ्नात्प्रमुच्यते। महादोषात्प्रमुच्यते। महापापात्प्रमुच्यते। स सर्वविद्भवति स सर्वविद्भवति। य एवं वेद। इत्युपनिषत्। ॐ भद्रंकर्णेभिः०। स्वस्तिन०। सहनाववतु। सहनौ भुनक्तु। सहवीर्यं करवावहै। तेजस्विनावधीतमस्तु। मा विद्विषावहै। ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः॥

भावार्थ :—

पूजन केल्याने रक्षण करणाऱ्या देवांनो आम्ही आमच्या कानांनी कल्याणकर शब्द ऐकावे. आमच्या डोळ्यांनी मंगल पहावे आणि आमच्याकडून तुमची सेवा घडावी. यासाठी आम्हाला दीर्घायुष्य द्या. कीर्तीवान इंद्र आमचे कल्याण करो. पूषा देव आणि तार्क्ष्य देव आमचे कल्याण करोत आणि बृहस्पति आम्हाला ज्ञान देऊन आमचे कल्याण करो.

ॐ स्वरुपा देवादि गणांचा स्वामी असलेल्या गणेशा तुला नमस्कार असो. तत्त्वब्रह्म तूच आहेस. जगाचा कर्ता केवळ तूच आहेस. जगाचा

पालन धारण करणारा केवळ तूच आहेस. सर्वांचा संहारकर्ता केवळ तूच आहेस. इदं शब्दाने प्रतीत होणारे ब्रह्म तूच आहेस. साक्षात् जगतात्मा तूच आहेस. ॥ १ ॥ मी हे मनाने आणि वाणीने खरे सांगतो. ॥ २ ॥ तू माझे रक्षण कर. तुझे गुण गाणाऱ्या आणि श्रवण करणाऱ्यांचेही रक्षण कर. तू मला सन्मार्गदर्शक उपासना देणाऱ्या गुरुचे रक्षण कर. जवळ राहून उपासना करणाऱ्या शिष्यांचे रक्षण कर. पूर्व–पश्चिम, उत्तर–दक्षिण तसेच सर्व बाजूंनी तू माझे रक्षण कर. ॥ ३ ॥ सर्व वेद ही तुझीच मूर्ति होत. वस्तूमात्रात आढळणारे चैतन्य तू आहेस. आनंदमय ब्रह्म तू आहेस. ज्ञान आणि विज्ञान ही दोन्ही तुझीच रूपे आहेत. ॥ ४ ॥ हे जग तुझ्यापासून उत्पन्न होते आणि तुझ्याच आधार-शक्तीने स्थिर रहाते. आणि अखेरीस तुझ्याच ठिकाणी जगाचा लय होतो. पंचमहाभुते ही पाच तत्त्वे तूच आहेस. वाणीचे स्थान तूच आहेस ॥ ५ ॥ तू सत्त्व, रज, तम या गुणत्रयापलिकडे आहेस. त्याच-प्रमाणे तू देहत्रयापलिकडे आणि कालत्रयापलिकडे आहेस. शक्तित्रय ही तुझीच रूपे आहेत. म्हणून सज्जन लोक तुझे स्मरण करतात. ब्रह्मा, विष्णू, रुद्र, इंद्र, अग्नी, वायू, सूर्य, चंद्र, तिन्ही लोक सर्व काही तूच आहेस ॥ ६ ॥ गण शद्बातील आधी ग हे व्यंजन प्रथम उच्चारून अ हा स्वर नंतर उच्चारावा. ग वर अनुस्वार द्यावा. तो अर्धचंद्राकृती-प्रमाणे शोभणारा असावा. म्हणजेच तो ॐ गँ असा म्हणावा. हे देवा तुझ्या सर्वश्रेष्ठ एकाक्षर मंत्राचे स्वरूप हे आहे. म्हणून “ ॐ गँ गणपतयेः नमः ” या मंत्ररूप गणपतीला नमस्कार असो. ॥ ७ ॥ त्या गणपतीला आम्ही ओळखतो. त्याचे आम्ही ध्यान करतो. म्हणून तो आम्हाला सुबुद्धी देवो. ॥ ८ ॥ चार आयुधे चार हातात धारण

करणारा, मुषक ध्वज असलेला, तांबडे वस्त्र परिधान केलेला, तांबड्या फुलांनी पूजन केलेला, भक्तांविषयी दया वाटणारा आणि सर्व जगाचे अधिकरण असलेल्या अखंड अविनाशी गणेशाला माझा नमस्कार असो. ॥ ९ ॥ व्रातपती, गणपति, प्रथमपति, लम्बोदर, एकदन्त, विघ्ननाशी, शिवसुत, वरदमूर्तिला नमस्कार असो. ॥ १० ॥ जो हे अथर्वशीर्ष नेहमी म्हणतो तो समर्थ होऊन त्याला सुखप्राप्त होते. त्याची संकटे दूर होऊन तो पंचमहा पापातून मुक्त होतो. तो विघ्नपीडा रहित होऊन त्याला चार पुरूषार्थांपैकी कोणताही पुरूषार्थ प्राप्त होतो. अशा रीतीने अथर्वशीर्षपठणाचे महत्त्व सांगून शेवटी म्हटले आहे, ह्या प्रमाणे हा अथर्वशीर्ष महिमा जो समजून घेतो, तो कृतार्थ होतो. अथर्व शीर्षही उपनिषद् श्रुति होय.

आरती

सुखकर्ता दुःखहर्ता वार्ता विघ्नाची । नुरवी पुरवी प्रेम कृपा जयाची ॥ सर्वांगी सुंदर उटि शेंदूराची । कंठी झळके माळ मुक्ताफळांची ॥१॥ जय देव जय देव जय मंगलमूर्ति ॥ दर्शनमात्रे मनकामना पुरती ॥ ध्र. ॥ रत्नखचित फरा तुज गौरीकुमरा । चंदनाची ऊटी कुंकुमकेशरा ॥ हिरेजडित मुगुट शोभतो बरा । रुणझुणती नूपुरें चरणी घागरिया ॥ जय० ॥ २॥ लंबोदर पीतांबर फणिवरबंधना । सरळ सोंड वक्रतुंड त्रिनयना ॥ दास रामाचा वाट पाहे सदना । संकष्टी पावावे, निर्वाणी रक्षावे सुरवरवंदना ॥३॥ जय देव जय देव०॥


रवि


चार कथा